

# ‘रुग्ण हक्कांचे संरक्षण, चांगल्या रुग्णालयाचे लक्षण!’

## रुग्ण हक्कांची ओळख करुन देत आहे-

## ‘साथी’, पुणे

साथी
Support for Advocacy & Training to Health Initiatives

प्रकाशन-

**साथी** (Support for Advocacy & Training to Health Initiatives)

फ्लॅट नं. ३-४, अमन-ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी

कोथरूड, पुणे-३८, फोन - ०२० २५४७२३२५/२५४७३५६५

E-mail- sathicehat@gmail.com

website- www.sathicehat.org




सर्किट- भाई, तुम तो डॉक्टर बन गये, लेकीन तुम्हे पता है पेशंट की क्या वाट लगेली?

मुन्नाभाई- क्यूँ? क्या हुआ सर्किट?

सर्किट- भाई, सरकारी अस्पताल की हालत तो तुमको पताही है, और प्रायव्हेट में तो लूट मची है. पैसे देकर भी अच्छी सुविधा नही मिलती.

# सद्यःस्थिती खाजगी आरोग्य व्यवस्था



श्रीमंतांना प्राधान्य



गरिबांकडे दुर्लक्ष





अनावश्यक उपचार व तपासण्या

**भरपूर फी देऊनही ही परिस्थिती!**



रुग्णांना अपमानकारक वागणूक



गोपनीयता व खाजगीपणाचा अभाव

# रुग्ण हक्कांचा कायदा








**बॉम्बे नर्सिंग होम रेग्युलेशन सुधारित ॲक्ट २००५ च्या नियमावलीमध्ये विभाग १६, नियम क्र.१४ मध्ये रुग्णांचे काही हक्क पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत.**

# आरोग्य सेवांचा हक्क




स्त्री

पुरुष






ग्रामीण



शहरी






गरीब

सर्वांना समान
आरोग्य सेवा

श्रीमंत



**भेदभाव न करता आरोग्य सेवा मिळणे हा प्रत्येकाचा हक्क आहे.**

# अपघातग्रस्तांना जीवरक्षक प्रथमोपचार मिळण्याचा हक्क






**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येक अपघात झालेल्या व्यक्तीला तातडीचे जीव वाचवणारे उपचार मिळण्याचा हक्क आहे. पैशाची तरतूद, पोलीस चौकशी यांचा अडसर न करता उपचार मिळाले पाहिजेत.**

# माहितीचा अधिकार




## माहितीचा हक्क

- आजाराचे निदान/शंका
- आजाराचे स्वरूप व गंभीरता
- उपचाराचे स्वरूप व दुष्परिणाम
- अंदाजे येणारा खर्च
- दरपत्रक
- डिस्चार्ज कार्ड
- मागितल्यावर इनडोअर (ॲडमिट) केस पेपरची प्रत
- सर्व रिपोर्ट


**रुग्णाला किंवा रुग्णाने सांगितलेल्या नातेवाईकाला वरील सर्व माहिती मिळण्याचा अधिकार आहे.**

साथी

# खाजगीपणा व सन्मानाची वागणूक जपण्याचा हक्क




स्त्री रुग्णांना पुरुष डॉक्टर तपासताना स्त्री कर्मचारी /स्त्री नातेवाईक सोबत हवी.




रुग्णाची मान्यता असलेल्या व्यक्तीच्या समोरच तपासणी केली जावी.

प्रत्येक रुग्णाला तपासताना किंवा उपचार करताना वेगळी जागा किंवा पडदा असावा.




**रुग्णाचा खाजगीपणा जपला जाणे हा त्याचा हक्क आहे.**


# गोपनीयतेचा हक्क


तुम्ही काही काळजी करू नका. ही माहिती गोपनीय ठेवणे माझ्यावर बंधनकारक आहे. तुमच्या संमतीशिवाय मी इतर कोणालाही ही माहिती सांगणार नाही.


# उपचारांबाबत निर्णय घेण्याचा हक्क



भूल देणे



शस्त्रक्रिया




रक्त चढविणे

**जोखमीच्या उपचारांबाबत पुरेशी माहिती मिळाल्यानंतर त्यासाठी संमती देण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क रुग्णाला आहे.**

# दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेण्याचा हक्क



# एच.आय.व्ही. बाधित रुग्णास भेदभावरहित उपचार मिळण्याचा हक्क



# तक्रार करण्याचा हक्क





**रुग्ण हक्कांचे संरक्षण, चांगल्या दवाखान्याचे लक्षण!**

वरीलपैकी कोणतेही हक्क नाकारले जात असतील तर रुग्णालयातील सक्षम अधिकाऱ्याकडे तक्रार करण्याचा व सविस्तर चौकशी करून घेण्याचा हक्क रुग्णाला आहे. त्यानंतरही न्याय मिळाला नाही तर रुग्ण ग्राहक मंचाकडे दाद मागू शकतो.

# रुग्णालयात वैद्यकीय संशोधन केले जात असल्यास...




कोणत्याही औषधाची किंवा लसीची चाचणी करून घेण्याआधी पुरेशी माहिती मिळायला हवी. त्यानंतरही या संशोधनात सामील व्हायला नकार देण्याचा हक्क रुग्णाला आहे.




सर्किट- भाई एवढे सर्व हक्क रुग्णांना आहेत पण याची खूपशा लोकांना माहितीच नाही.

मुन्नाभाई- अरे! म्हणूनच ही माहिती सगळ्यांपर्यंत पोहचवूयात आणि रुग्णांच्या हक्कांसाठी एकत्रित येऊया! गरज पडली तर त्यासाठी गांधीगिरी करूया!